दिनांक 20/10/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 71

**विषय:-** नगरविकास विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.नपावै-2022/प्र.क्र 138अ(38)/नवि.-16 मंत्रालय,मुंबई दिनांक 15/06/2022 प्रमाणे प्रस्तावित कामांसाठी प्रमाणपत्र देणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- दिनांक 18/10/2022 ने नगरअभियंता व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणी नुसार.

वरील विषयान्वये विटा नगरपरिषद हद्दीतील वैशिष्टपुर्ण कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडून 4 कामांसाठी 200.00 लक्ष अनुदान मंजूर करणेत आलेले आहे. संदर्भिय शासन निणर्यानुसार कार्यान्वयीन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग आहे. उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे मी उपविभागीय अधिकारी तथा प्रशासक, विटा नगरपरिषद, विटा म्हणून पुढील निर्णय पारीत करीत आहे.

वैशिष्टयपुर्ण योजने अतर्गत महाराष्ट्र शासनाकडून 4 कामांसाठी 200.00 लक्ष अनुदान मंजूर करणेत आलेले आहे. त्यानुसार सदर कामे खालील प्रमाणे.

1) विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.11 मधील जैन मंदिर ते कराड रोड पर्यंत रस्ता व गटर करणे.
2) विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.8 नेवरी रोड ते कराड रोड (बादशाह भई गॅरेज मार्ग) रस्ता करणे.
3) विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.5 कदमवाडा ते घुमटमाळ लेंडुरीचा ओढयावर पुल बांधणे.
4) विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.5 नेहरूनगर येथे खंडोबा मंदिर व मरिमी मंदिरासमोर सभागृह बांधणे.

वरील अ.क्र.4 चे कामास प्रशासकीय ठराव नं.50 दिनांक 03/10/2022 ने मंजूरी दिलेली आहे.उर्वरित अ.क्रं.1 ते 3 कामांना मंजूरी देत आहे. वरील कामांची देखभाल व दुरुस्ती करणेची जबाबदारी नगरपरिषदेची राहील. तसेच शासन निर्णय क्रंमांक – क्रं.नपावै-2022/प्र.क्रं.138अ(38)/नवि -16 मंत्रालय, मुंबई दिनांक 09/06/2022 मधील मुद्दा क्रं.9(अ) नुसार सदर प्रकल्पा अंतर्गत कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणी करावीत.

पान नं.2

तरी वरील कामांना उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून मागणी करण्यात आलेली प्रमाणपत्रे नगरपरिषद अटी व शर्तीस अधिन राहून देणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा